# जिल्हादंडाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद

(उपचिटणीस शाखा)

दुरध्वनी क्रमांक 02472-227301 Email ID- rdc1osmanabad@gmail.com

वाचा:- 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.

2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.

3. आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 30, 33, 34, 41 व कलम 51.

4. भारत सरकार, गृह मंत्रालय, यांचे आदेश क्र. 40-3/2020-डीएम-1(ए) दिनांक 29 जुलै 2020.

5. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, अधिसूचना क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दि. 29 जुलै 2020.

6. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दि. 02.08.2020.

7. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दि. 11.08.2020.

DISTRICT MAGISTRATE OSMANABAD

क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26

दिनांक:- 21/08/2020.

आदेश :-

ज्याअर्थी उपरोक्त वाचा क्र. 2 चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" प्रसिद्ध केले असून यातील नियम क्र. 3 नुसार करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी कोरोना कोविड-19 विषाणुमुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव रोखण्याच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याकरिता व त्यावर नियंत्रण आणण्यासाठी संदर्भ क्र. 4 व 5 चे अनुषंगाने संदर्भ क्र. 6 अन्वये दि. 31 ऑगस्ट 2020 पर्यंत उस्मानाबाद जिल्ह्यात लॉकडाऊन वाढविण्यात आले असून लॉकडाऊनमध्ये करावयाच्या कार्यवाहीबाबत आदेश पारित केलेला आहे. तसेच संदर्भ क्र. 7 च्या आदेशान्वये संदर्भ क्र. 6 च्या आदेशामध्ये सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार दर शनिवारी जनता कर्फ्यू राहील असे आदेशित केलेले आहे.

ज्याअर्थी दि. 22.08.2020 पासून श्रीगणेशोत्सवास सुरुवात होत असून दि. 22.08.2020 रोजी शनिवार असल्याने यादिवशी नागरिकांना श्रीगणेशमूर्ती व इतर अनुषंगिक साहित्याची खरेदी करता यावी यासाठी जनता कर्फ्यूमध्ये शिथिलता देणे आवश्यक आहे.

त्याअर्थी मी कौस्तुभ दिवेगावकर, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद उपरोक्त वाचा क्र. 2 व 3 अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारांनुसार उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये नागरिकांना गणेशोत्सवाचे कालावधीत श्रीगणेशमूर्ती व अनुषंगिक इतर साहित्याची खरेदी करता यावी याकरिता दि. 22.08.2020 व दि. 29.08.2020 रोजीच्या जनता कर्फ्यूमध्ये खालील नमूद बाबींकरिता शिथिलता देत आहे.

Scanned by CamScanner

Scanned by CamScanner

1. दि. 22.08.2020 व दि. 29.08.2020 रोजीचे जनता कर्फ्यूदिवशी श्रीगणेशमूर्तींची व श्रीगणेशोत्सवाकरिता लागणा-या साहित्याची विक्री करणारी दुकाने चालू ठेवण्यास परवानगी राहील.
2. वरिल नमूद दुकानांव्यतिरिक्त् अन्य दुकाने व बाजारपेठ तसेच आस्थापना यांचेकरिता दि. 22.08.2020 व दि. 29.08.2020 रोजीचा जनता कर्फ्यू पूर्वीप्रमाणेच लागू राहील.

सदरील आदेशाची कडक अंमलबजावणी सर्व संबंधित यंत्रणांनी करावी. कुठल्याही व्यक्तींकडुन या आदेशातील सुचनांचे उल्लंघन झाल्यास त्यांचेविरुध्द आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 च्या कलम 51 ते 60 व भारतीय दंड संहिता कलम 188 नुसार कायदेशीर कारवाईस पात्र राहील. तसेच अन्य कायदेशीर कारवाई देखील केली जाईल.

सदरचा आदेश आज दि. 21/08/2020 रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिला आहे.

(कौस्तुभ दिवेगांवकर)
**जिल्हादंडाधिकारी उस्मानाबाद तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**
DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD

**प्रत:-** मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
**प्रत:- आवश्यक कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
2. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.
3. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, उस्मानाबाद.
4. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि. प. उस्मानाबाद.
5. अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, उस्मानाबाद.
6. जिल्हा प्रशासन अधिकारी, न. पा. प्र. जि. का. उस्मानाबाद.
7. व्यवस्थापक, जिल्हा अग्रणी बँक, उस्मानाबाद.
8. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.
9. विभाग नियंत्रक, रा. प. मंडळ, उस्मानाबाद.
10. उपविभागीय अधिकारी तथा INCIDENT COMMANDER सर्व जि. उस्मानाबाद.
11. सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, उस्मानाबाद.
12. तहसिलदार तथा INCIDENT COMMANDER सर्व जि. उस्मानाबाद.
13. मुख्याधिकारी नगर परिषद / नगर पंचायत सर्व जि. उस्मानाबाद.
14. सर्व संबंधितांस अनुपालनास्तव.

**जिल्हादंडाधिकारी उस्मानाबाद तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**
DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD

Scanned by CamScanner
Scanned by CamScanner